नि.क्र.२२

**वादीतर्फे साक्षीदार क्र.१ श्री. सुर्यभान मोहन वडितके**

**<u>पुढील सरतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री. आर. एस. हळनोर यांचे मार्फत शपथेवर सुरु</u> –**

१. शपथपत्रातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. मी दाव्यामध्ये प्रतिवादी नं. १ च्या पतीने माझ्या हक्कात करुन दिलेले खरेदीखत दाखल केले असुन त्यावर बाबुराव मोहन वडितके यांची खरेदी देणार म्हणुन सही असुन खरेदी घेणार म्हणुन माझे नाव आहे. त्यावर माझी सही आहे. ते **<u>नि.३१</u>** वर आहे.

<u>सरतपास पुर्ण.</u>

**<u>उलटतपास प्रतिवादी तर्फे विधीज्ञ श्री. आर. बी. कोळेकर यांचे मार्फत शपथेवर सुरु</u> –**

२. मला तीन भाऊ व दोन बहिणी आहेत. दावा मिळकत ही आमची वडिलोपार्जित मिळकत आहे. बाबुराव मोहन वडितके हे माझे सख्खे भाऊ होते. खरेदीखत नि.३१ मध्ये दावा मिळकतीची लांबी रुंदी नमुद नाही. दि.२२/०४/१९९४ रोजी बाबुराव मोहन वडितके हा विवाहीत होता व त्याला मुले होती. त्याच्या मुला मुलींची खरेदीखत नि.३१ वर संमतीसाठी सही नाही. खरेदीखत नि.३१ करतेवेळी दावा मिळकतीची भुमी अभिलेख कार्यालयामार्फत मोजणी झालेली नव्हती. खरेदीखत करतेवेळी आमच्या एकत्र कुटुंबाच्या मिळकतीचे वाटप झाल्याचा कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. आमच्या वडिलोपार्जित मिळकतीचे वाटप कुठल्या वर्षी झाले हे दाखविणारा कागदोपत्री पुरावा नाही. बाबुराव मोहन वडितके याच्या सर्व वारसांना दाव्यात पक्षकार केलेले नाही. गट क्र.५ मध्ये प्रतिवादींव्यतिरिक्त इतर सहा लोकांच्या जमिनी आहेत. नि.३१ खरेदीखतामध्ये माझी खरेदी घेणार म्हणुन सही नाही. नि.३१ खरेदीखतामध्ये दस्त करुन देणार असे टंकलिखित केलेले नाही. खरेदीखत नि.३१ नंतर दावा दाखल करेपर्यंत प्रतिवादींनी मिळकतीचा बांध फोडल्याची तक्रार मी तहसील कार्यालयाकडे केलेली नाही. खरेदीखत नि.३१ मध्ये नमुद केलेले २४ आर क्षेत्र प्रत्यक्षामध्ये भरत नाही अशी मागणी तक्रार आहे. बाबुराव मोहन वडितके याच्या हयातीमध्ये सदर २४ आर क्षेत्र प्रत्यक्षात भरत नसल्याची तक्रार मी कधीही केलेली नाही. बाबुराव मोहन वडितके याच्याकडे वडिलोपार्जित १ एकर ४ गुंठे क्षेत्र होते. २४

आर क्षेत्राची मोजणी करण्यास प्रतिवादींनी मला संमती दिली होती व त्यानुसार भुमी अभिलेख कार्यालयाकडुन सदर मोजणी दावा प्रलंबित असतांना करण्यात आली. त्यामध्ये गट क्र.५ च्या संपुर्ण क्षेत्राची मोजणी करण्यात आली. त्यामध्ये गट क्र.५ च्या लगतच्या ३ गटामधील क्षेत्रामध्ये अतिक्रमित क्षेत्र निघाले. त्यामध्ये सोमनाथ भिकाजी चिंधे, मंदा बापुसाहेब शिंदे, सुदेश गाडेकर यांच्याकडे अतिक्रमीत क्षेत्र निघाले. दावा मिळकतीच्या पुर्व बाजुला दावा मिळकतीमध्ये सोमनाथ भिकाजी चिंधे याचे अतिक्रमण निघाले. भुमी अभिलेख कार्यालयामार्फत मोजणी करण्यापुर्वी आम्ही दावा मिळकतीची खाजगी मोजणी केली होती. मी दावा मिळकतीची मोजणी होऊन बांध हददी निश्चित करण्याकरिता कुठल्याही न्यायालयात दावा दाखल केला नाही. प्रतिवादींची आर्थिक परिस्थिती माझ्यापेक्षा गरिबीची आहे किंवा नाही हे मला सांगता येणार नाही. प्रतिवादींना गट क्र.५ मधील २० आर क्षेत्राशिवाय इतर मिळकत आहे किंवा नाही हे मला सांगता येणार नाही. प्रतिवादी क्र. २ हा किराणा दुकानात काम करतो हे मला सांगता येणार नाही. प्रतिवादी हे खरेदीखत नि.३१ प्रमाणे मला जमीन मोजुन देण्यास तयार नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत ही २४ आर भरत नसल्यामुळे मी प्रतिवादींविरुद्ध खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा दाखल करण्याकरिता दि.२४/०४/२०२२ रोजी कारण घडल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दाखल करुन आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृती

Sd/-

**(आर.बी.गिरी)**

दिनांक १९/०८/२०२५

दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,

श्रीरामपुर.